महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं दिनांक:-८ जुलै २०२२

# -:प्रसिध्दीपत्रक:-

विषय:- राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या नवीन परीक्षा योजनेबाबत
संदर्भ:- आयोगाचे दिनांक २४ जून २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रम यामध्ये बदल करण्याचा व सन २०२३ च्या राज्यसेवा परीक्षेपासून सदर बदलेलेल्या परीक्षा योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. सदर बदलाबाबत संदर्भिय दिनांक २४ जून २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे उमेदवारांना अवगत करण्यात आले आहे.

२. राज्यसेवा परीक्षेच्या योजनेसंदर्भातील बदल सन २०२३ ऐवजी २०२४ अथवा २०२५ पासून लागू करण्यासाठी आयोगावर संघटितपणे दबाव आणण्याची मोहिम काही स्वयंघोषित संघटना, खाजगी क्लासेस, उमेदवार इत्यादींच्या पुढाकाराने राबविली जात असल्याचे तसेच, त्यामुळे सन २०२३ मध्ये सदर बदलाच्या अंमलबजावणीबाबत उमेदवार संभ्रमात असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आली आहे. यास्तव, उमेदवारांस आश्वस्त करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही संघटित अथवा असंघटित दबावाची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही व आयोगाच्या निर्णयानुसार नवीन परीक्षा योजना व अभ्यासक्रमासह राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षा २०२३ चे आयोजन करण्यात येईल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग